# मुंबई विद्यापीठ

प्रसिध्दी पत्रक

दिनांक – ३१ ऑक्टोबर २०१५

## सार्वभौम भारताच्या निर्मितीमध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांचे मोठे योगदान – कुलगुरु डॉ.संजय देशमुख

मुंबई - स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री आणि पोलादी पुरूष वल्लभभाई पटेल यांचे सार्वभौम भारताच्या निर्मितीमध्ये मोठे योगदान असून त्यांच्या अतुलनीय कामगीरीमुळे आज एकसंध भारताची संकल्पना सत्यात उतरली असल्याचे प्रतिपादन कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी केले.मुंबई विद्यापीठातर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय एकता दिवसाच्या कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते.पुढे ते म्हणाले की, लहानपणापासूनच संघटन कौशल्य असणार्या पटेल यांना साहस आणि राष्ट्रभक्ती त्यांच्या वडिलांकडून पिढीजात मिळाली होती. त्यांचे वडील जवेरभाई राणी लक्ष्मीबाई यांच्याबरोबर स्वातंत्र्याची पहिली लढाई लढले होते. ६२५ संस्थानात विखूरलेल्या भारतातील विविध संस्थानांचे एकत्रीकरण आणि विलीनीकरुन करुन त्यांनी अखंड राष्ट्राची निर्मिती केली.त्यांचे हे योगदान वाखाण्याजोगे असून तरुण पीढीसमोर ते एक आदर्श आहे.त्याचप्रमाणे स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून ओळखल्या जाणा-या दिवंगत श्रीमती इंदिरा गांधी यांच्या स्मृतीस उजाळा देताना ते म्हणाले की,स्वतंत्र भारताला भेडसावणा-या समस्यांचे अचुक निराकरण करुन इंदिरा गांधी यांनी समृध्द राष्ट्राच्या निर्मितीत योगदान दिले आहे.स्वातंत्र्यानंतर देशाला भेडसावणा-या अन्न समस्येवर हरीतक्रांती सारखे ठोस पाऊल उचलून त्यांनी देशाला सुजलाम सुफलाम बनविण्यातही मोठे योगदान दिले.

मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामध्ये मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय एकतेची शपथ दिली.कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांना सुरुवातीला सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनावर आधारीत चित्रफित दाखविण्यात आली.या कार्यक्रमाला मुंबई विद्यापीठाचे कुलसचिव डॉ.एम.ए.खान,नवनियुक्त बीसीयुडी संचालक डॉ.अनिल पाटील,वित्त व लेखा अधिकारी अशोक फळणीकर,राष्ट्रीय सेवा योजनेचे राज्य संपर्क अधिकारी डॉ.अतुल साळूंखे, विद्यार्थी कल्याण विभागाच्या संचालिका डॉ.मनाली लोंढे,राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ.बिडवे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

लीलाधर बन्सोड,उपकुलसचिव (जनसंपर्क)